# मनोगत

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत एम. फिल. (मराठी) पदवीसाठी मी **'ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांचा अभ्यास' ('प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' यांच्या अनुषंगाने)** हा विषय निवडला.मी ग्रामीण भागात जन्मल्याने, वाढल्याने साहित्यातील ग्रामजीवनाबद्दल विशेष आस्था वाटणे साहजिकच आहे. माझं गाव, माझी माणसं, माझं घर आणि माझ्या आई-पांढरीतील माती यांच्याशी असलेली नाळ लघु प्रबंधाचा हा विषय निवडण्यापाठीमागे कारण ठरली. एम. ए. पर्यंतच्या अभ्यासामध्ये, वाचनामध्ये ग्रामीण कविता अभ्यासताना या कवितांमधून काहीतरी थोडे का होईना राहिल्याची, खऱ्याखुऱ्या ग्रामीणतेची उणीव मनामध्ये सलत होती. कवितेचा ठराविक साच्यातील आकृतीबंध कवीच्या आशय-अभिव्यक्तीला अडचणींचा ठरतो. हे लक्षात आल्यानंतर कवीच्या मनातील संवेदनांना, भाव-भावनांना विस्तृत स्वरूपात शब्दरूप देणारी दीर्घ कविता मला 'आपलेपणा' देणारी वाटली. म्हणूनच ग्रामीण जीवनाचे वास्तवाभिमुख चित्रण करणाऱ्या ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांचा अभ्यास हा विषय प्रस्तुत संशोधनासाठी निवडला. लघुप्रबंधासाठी डॉ.शिवाजीराव पाटील यांच्या मार्गदर्शनखाली अभ्यासाचा आराखडा तयार केला. आज हा अभ्यास पूर्णत्वाकडे जाताना मनाला विलक्षण आनंद होत आहे.

माझी ओळख झाल्यापासून नेहमी माझ्या पाठीवर हात ठेऊन 'तू लढ' असे म्हणणारे माझे मार्गदर्शक आदरणीय डॉ. शिवाजी पाटील यांचे ऋण माझ्याबरोबर कायम राहतील. रयत शिक्षण संस्थेचे सचिव व छत्रपती शिवाजी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जे. जी. जाधव, साईश्रद्धा एज्युकेशनल सोसायटी, साताराचे संस्थापक चेअरमन मा. निलेश कुलकर्णी, त्याचबरोबर दहिवडी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे, डॉ. शंकरराव बोऱ्हाडे-नाशिक, डॉ. शिवलिंग मेनकुदळे, प्रा.बलवंत, प्रा.संतोष पवार, प्रा. पाटोळे, साईश्रद्धाचे सचिव मा. अमृत पवार आणि माझे मित्र प्रा. धनाजी लेंढवे, नाथाजी गायकवाड, नंदकुमार शेडगे , डॉ. किरण कुंभार, श्री वडजाई शिक्षण संस्थेचे सचिव लक्ष्मीकांत कुलकर्णी, सर्व सभासद आणि मित्र परिवार, वेळोवेळी ग्रंथसंपदा उपलब्ध करून देणारे छ. शिवाजी महाविद्यालयाच्या ग्रंथालयाचे ग्रंथपाल व सर्व कर्मचारी यांचा मी आभारी आहे.

माझे बाबा श्री. नंदकुमार जोशी व आई सौ. दयावंती जोशी, मामा श्री. विठ्ठल कुलकर्णी आणि वेळोवेळी सर्वोपरी मदत करणारे काका प्रा. प्रमोद जोशी व सौ. स्मीता काकू यांच्या प्रोत्साहनामुळेच मी हा अभ्यासविषय पूर्ण करू शकलो.

सदर प्रबंधाची आकर्षक बांधणी व कॉम्प्युटर टायपिंग करून देणारे मे. रिलॅक्स सायक्लोस्टायलिंग, साताराचे श्री. मुकुंद ढवळे, राजू कुलकर्णी व त्यांचे सर्व सहकारी यांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

या अभ्यासामध्ये मला साह्य करणारे सर्व गुरूवर्य, अनेक क्षेत्रातील व्यक्ती, ग्रंथालये, सहकारी मित्र, नातेवाईक या सर्वांचे शतशः आभार !

**(जोशी नितीन नंदकुमार)**

# भूमिका

१९२५ च्या आसपास ग्रामीण कवितेच्या लेखनाला सुरूवात झाली. या काळातील कवितेतून वास्तव चित्रणापेक्षा काल्पनिक वर्णनच अधिक झाल्याचे दिसून येते. ग्रामीणतेला स्पर्श न होताच या कविता लिहिल्यिा गेल्या. मात्र १९६० नंतर मराठी ग्रामीण कविता खऱ्या अर्थाने बहरलेली दिसते. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर, औद्योगिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक इ. सर्वच बाबतीत झालेल्या बदलामुळे साहजिकच ग्रामीण जीवनातही बदल होऊ लागले आणि एकंदरीतच ग्रामीण साहित्यातही बदल झाले. ग्रामीण कथा, कादंबरी प्रमाणेच कवितेतही 'ग्रामीण संस्कृती' ला स्थान मिळाले.

केवळ कल्पनाविलासातच रंगून न जाता हाडामासाच्या माणसाचे, त्याच्या जीवनाचे वास्तव चित्रण ग्रामीण कवितेतून होऊ लागले. १९८५ नंतर ग्रामीण कवितेच्या वाटा अधिक ठळक दिसू लागल्याचे दिसून येते. या दृष्टीने एकूण कवितेतील ग्राम संस्कृतीचा अभ्यास मराठी समीक्षेच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरतो.

ग्रामीण जीवनाला केंद्रबिंदू मानून काव्यलेखन करणाऱ्या ना. धों. महानोर यांनी निसर्गाला मानवी रूपातून साकारत निसर्गाची अनेक रूपे दीर्घ कवितेतून साकारलेली आहेत. महानोरांची कविता ग्रामीण जनजीवनाच्या तळाशी जोडलेली आहे. निसर्गातील सप्तरंगाची चौफेर उधळण करणारी महानोरांची कविता मराठी कवितेचा महत्त्वाचा टप्पा मांडला जातो. ग्रामीण संस्कृतीचा अस्सल आविष्कार त्यांच्या दीर्घ कवितेतून अधिक प्रभावीपणे झालेला दिसून येतो. महानोरांच्या 'प्रार्थना दयाघना' आणि 'गंगा वाहू दे निर्मळ' या दीर्घ कविता संग्रहांचा अभ्यास एम. फिल. पदवीसाठीच्या लघुप्रबंधाच्या स्वरूपात मांडला जाणार आहे. प्रस्तुत कविता संग्रहांची अभ्यासासाठी निवड करून ग्रामीण संस्कृतीच्या वैविध्यपूर्ण पैलूंचा विवेचक अभ्यास मांडला जाणार आहे.

'ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांचा अभ्यास' हा विषय निवडण्या पाठीमागे दोन बाबी महत्त्वाच्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे महानोरांनी स्फूट कवितात ग्रामजीवन ज्या स्तरावर रेखाटले आहे, त्या स्तरावरील प्रकट चिंतनात्मकता त्यांच्या दीर्घ कवितेत अधिक स्पष्ट व प्रभावीपणे व्यक्त झाल्याचे दिसून येते. आणि दुसरे म्हणजे महानोरांच्या दीर्घ कवितेतील ग्रामीण जनजीवनाचे वर्णन ग्रामीण संस्कृतीच्या परिप्रेक्षात स्वतःचा आत्मशोध घेणारे आहे. त्या दृष्टीने ग्रामसंस्कृतीतील बदलते रूप पद्धतशीर मांडून ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांमधून व्यक्त होणाऱ्या ग्रामीण संस्कृतीच्या चित्रणाचा विवेचक अभ्यास मांडणे हा या संशोधनाचा मूळ गाभा आहे.

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

'ना. घ. देशपांडे व ना. धों. महानोर ह्यांच्या समग्र काव्याचा तुलनात्मक अभ्यास' (राजेंद्र नायकवडे, नागपूर, २००१) ह्या पीएच. डी. पदवीच्या प्रबंधातून प्रामुख्याने महानोरांच्या समग्र कवितांची चिकित्सा झालेली आहे. तसेच 'मराठी ग्रामीण कविता : चिकित्सक अभ्यास' ( कैलास सार्वेकर, पुणे १९९६), 'आधुनिक मराठी ग्रामीण कविता : एक चिकित्सक अभ्यास' (हेमलता गायकवाड, कोल्हापूर १९९०), 'ग्रामीण साहित्यातील शेतकरी जीवन' (वामन जाधव, औरंगाबाद २००५) अशा पीएच. डी. प्रबंधातून एकूणच ग्रामीण कवितेचे आकलन करून देताना महानोरांच्या कवितेचा विचार झालाच आहे. शिवाय राजेंद्र नायकवडे, हेमलता गायकवाड, कैलास सार्वेकर यांचे संशोधन पुस्तक रूपात उपलब्ध झालेले आहे. 'ग्रामीण वाङ्मयाच्या इतिहास' (संपा. चंद्रकुमार नलगे) ह्या ग्रंथातही ग्रामीण कवितेचा संक्षिप्त आढावा घेताना महानोरांच्या कवितेचे विशेष सांगितले आहेत. त्या शिवाय काही पुस्तकांधमील प्रकरणे, नियतकालिकांमधील लेखातून महानोरांच्या कवितांविषयी समीक्षा मांडण्याचे प्रयत्न झालेले दिसून येतात.

परंतु त्यांच्या दीर्घ कवितेबद्दल स्वतंत्रपणे समीक्षा झालेली नाही. त्याचबरोबर 'गंगा वाहू दे निर्मळ' हा २००७ मधील एक महत्त्वाचा कविता संग्रह असल्यामुळे वरील संशोधनात याचा विचार येणे शक्यच नाही. ह्यामुळे त्यांच्या दीर्घ कवितांचा अभ्यास करणे हीच या संशोधनामागील भूमिका आहे.

'ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितांचा अभ्यास' ('प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' यांच्या अनुषंगाने) ह्या विषयाचे संशोधन करीत असताना चार प्रकरणात विभागणी केली आहे. पहिल्या प्रकरणामध्ये ग्रामीण कवितेची वाटचाल संक्षिप्तपणे मांडून ना. धों. महानोरांच्या काव्य प्रवासातील टप्पे मांडले आहे. 'दीर्घ कविता : संकल्पना व वाटचाल' या दुसऱ्या प्रकरणामूधन दीर्घ कवितेचे स्फूट कवितेपेक्षा वेगळेपण कसे आहे ? याचे विवेचन करून कवितेच्या संदर्भात दीर्घ कवितांची वाटचाल संक्षिप्तपणे मांडली आहे. त्याचबरोबर एकूणच दीर्घ कविता म्हणून तिची वैशिष्ट्ये मांडली आहेत. तिसऱ्या प्रकरणात 'प्रार्थना दयाघना' व 'गंगा वाहू दे निर्मळ' या कवितासंग्रहातील दीर्घ कवितांचे आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने विवेचन केले आहे. 'ना. धों. महानोरांच्या दीर्घ कवितेचे विशेष' या चौथ्या प्रकरणामध्ये महानोरांच्या दीर्घ कवितेची ठळक वैशिष्ट्ये नोंदविली आहेत. उपसंहारात वरील सर्व प्रकरणांमधून हाती आलेल्या निष्कर्षांची मांडणी करून महानोरांच्या दीर्घ कवितांचे विवेचन केले आहे. शेवटी संशोधनात पुरक ठरलेल्या ग्रंथांची संदर्भसूची जोडली आहे.